**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ६.०० )**

**बुधवार दिनांक १५ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

**1. माओवादी कम्युनिस्ट पक्षाचा केंद्रीय समिती सदस्य भूपतीसह ६१ नक्षल्यांचं गडचिरोलीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आत्मसमर्पण**

**2. मतदार यादीतल्या त्रुटी दूर होईपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलाव्यात अशी विरोधी पक्षांची निवडणूक आयोगाकडे मागणी**

**3. महानगर पालिका निवडणुकीसाठी ६ नोव्हेंबर रोजी प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होणार**

**4. नागपूर महानगरपालिका आणि रोटरी क्लब ऑफ नागपूर (नॉर्थ) तर्फे आज पासून १७ ऑक्टोबर पर्यंत स्तनाच्या कर्करोगाविषयी जनजागृती मोहीम**

---

**मुख्यमंत्र्यापुढे आत्मसमर्पण**

माओवादी कम्युनिस्ट पक्षाचा केंद्रीय समिती सदस्य तथा पॉलिट ब्युरो सदस्य मल्लोजुला वेणुगोपाल उर्फ भूपती उर्फ सोनू उर्फ अभय, तसंच दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीच्या सदस्यांसह एकूण ६१ नक्षल्यांनी आज गडचिरोली इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापुढे आत्मसमर्पण केलं. ऐकुया आमच्या प्रतिनिधीचा रिपोर्ट -

***(कॅप्सूल पीटीसी गडचिरोली - १ मिनिट १० सेकंद)***

***भूपतीसारख्या नक्षल चळवळीला बौद्धीक ताकद देणाऱ्या मोठ्या कॅडरने आत्मसमर्पण करणं ही ऐतिहासिक गोष्ट आहे. त्याच्या आत्मसमर्पणामुळे माओवादी चळवळीच्या समाप्तीचा चॅप्टर लिहिण्याची सुरुवात गडचिरोलीतून झाल्याचा अभिमान आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.***

***(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस)***

***महाराष्ट्रामध्ये गेले 10 वर्ष आम्ही सातत्याने माओवादाच्या विरुद्ध एक प्रचंड मोठा लढा उभारला आणि आज तो लढा निर्णायक अशा पद्धतीनं त्या ठिकाणी समाप्ती कडे चाललेला आहे. मागच्या काळातल्या आत्मसमर्पणामुळे उत्तर गडचिरोलीतला माओवाद आपण पूर्ण समाप्त केला होता. आज दक्षिण गडचिरोलीतला माओवाद देखील आपण जवळपास समाप्त केलेला आहे.आणि गृहमंत्र्यांनी जे उद्दिष्ट ठेवलं होतं मार्च 2026 च त्याच्या आधीच महाराष्ट्राने हे उद्दिष्ट पूर्ण केल.***

*भविष्यात छत्तीसगडमधील माओवादी आत्मसमर्पण करतील तेव्हा रेड कॉरिडॉरमधील माओवाद संपुष्टात येईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.आत्मसमर्पण करणाऱ्या नक्षल्यांना लॉयड मेटल्ससारख्या कंपन्यांमध्ये प्रशिक्षण देऊन नोकऱ्या दिल्या जातील, असं आश्वासन दिलं. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांनी गडचिरोली पोलिस दलाला एक कोटी रुपयांचं बक्षीस जाहीर केलं.*

*आकाशवाणीसाठी गडचिरोली वरून मी जयंत निमगडे .*

२०२१ पासून आतापर्यंत १४० माओवाद्यांना अटक करण्यात आली आहे. आजवर ८१ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केलं आहे, तर ९३ जहाल माओवाद्यांना कंठस्नान घालण्यात आल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक निलोत्पल यांनी दिली.

-----------------------------------------

**छत्तीसगड आत्मसमर्पण**

छत्तीसगडमधे सुकमा इथं ५० लाखांचं बक्षीस असलेल्या २७ नक्षल्यांनी आत्मसमर्पण केलं आहे . त्यात पीएलजीए बटालियन क्रमांक १ मधे सक्रीय २ कट्टर माओवाद्यांचा समावेश असल्याचं सुकमाच्या पोलीस अधीक्षकांनी सांगितलं.

-----------------------------------------

**मतदारयादीतल्या त्रुटी/महाविकास आघाडी**

मतदार यादीतल्या त्रुटी दूर होईपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलाव्यात. अशी मागणी महाविकास आघाडी आणि काही पक्षांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. विविध विरोधी पक्षांच्या प्रतिनिधी मंडळाची आज मुंबईत निवडणूक आयोगाबरोबर चर्चा झाली, त्यानंतर विरोधी पक्षाच्या नेत्यांनी वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर करण्यात येणार नाही, मतदानाचे सीसीटीव्ही फूटेज दाखवले जात नाहीत, मतदार याद्या, विरोधी पक्षांना दाखवल्या जात नाहीत. त्यामुळे निवडणूक आयोग हा कठपुतळी म्हणून काम करत असून हा आयोगाचा भ्रष्टाचार असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली. निवडणूक आयोगाच्या उत्तरानं आपलं समाधान झालं नसून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला सामोरं जाणं योग्य नाही, असं काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात म्हणाले. दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या विधानसभा मतदारसंघांच्या यादीत नव्यानं नावं समाविष्ट करणं, अथवा वगळणं किंवा अन्य बदल करण्याचा विषय राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यकक्षेत येत नसल्याचं महाराष्ट्र राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी काल स्पष्ट केलं.

-----------------------------------------

**जीएसटी**

वस्तू आणि सेवा परिषदेनं जीएसटी कर रचनेत केलेल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या आहेत. नव्या कर रचनेमुळे अनेक वस्तू स्वस्त झाल्यान ग्राहकांना याचा फायदा होणार आहेच, शिवाय राज्यांच्या अर्थव्यवस्थेलाही मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे. नागपूरचे औषधांचे व्यापारी नितीन गांधी यांनी नव्यानं लागू झालेल्या सुधारणांमुळे औषध उद्योगावर झालेल्या परिणामाबद्दल प्रतिक्रिया दिली.

***(होल्ड बाईट - नितीन गांधी - ४१ सेकंद)***

***आज जो हमको स्टॉक पहले हम जो लेते थे उसके ऊपर हमको 12% टैक्स देना पड़ता था तो नियर अबाउट हमारे जो इवेंट कॉस्ट है वो इन्क्रीज़ हो जाता था नाउ अब जब हम उनको 5% ही भरना है तो हमें तो बेनिफिट हो ही गया है, उससे ही वन रक्षक दबाव पे जब कर्ब जीरो हो रहा है तो आप समझिए की वो जीरो होने के कारण जहाँ पहले जिसकी एमआरपी ₹1000 थी वो सीधे उसके एमआरपी 15 से 20 परसेंट डाउन हो जा रही है तो उसे तो फर्क तो पड़ना ही पड़ना है। अभी ये क्या हुआ कि जैसे ही इन्होंने जीएसटी कम किया है तो जो मध्यम वर्ग है, जो लोग अफोर्ड नहीं कर सकते थे, जो मेडिसिन उनके दायरे में आ गया है कि वो एक साथ पूरी 30 दवाइयां खरीद पाए पूरे महीने की जो थर्टी डेज का जो पूरा कोर्स है, वो पूरा कंप्लीट कर पाए।***

----------------------------------------

**कृषिमंत्री दत्तात्रय भरणे**

राज्यातील सेंद्रीय प्रमाणित आणि नैसर्गिक शेती उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी राज्य शासन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत आहे. केंद्र शासन प्रमाणित संस्थाकडून राज्यातील शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सेंद्रीय प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात येणार असून या तपासणीमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार आढळल्यास अशा संस्थांचा अहवाल केंद्र शासनाला पाठवणार असल्याचं कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितलं. मंत्रालय इथं सेंद्रिय प्रमाणीकरण संस्था संदर्भात कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

----------------------------------------

**मनपा निवडणूक**

नागपूर महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगान मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. १ जुलै २०२५ या दिनांकाला अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवर आधारित प्रारूप मतदार यादी ६ नोव्हेंबरला प्रसिद्ध होईल. यावर हरकती आणि सूचना दाखल करण्याची अंतिम तारीख १४ नोव्हेंबर निश्चित करण्यात आली आहे. त्यानंतर छाननी प्रक्रिया पूर्ण करून

अंतिम मतदार यादी २८ नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार आहे. मतदान केंद्रांची यादी ४ डिसेंबरला आणि मतदान केंद्रनिहाय मतदार यादी १० डिसेंबर रोजी जाहीर केली जाईल.

----------------------------------------

**माजी सैनिक अनुदान**

माजी सैनिकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना मिळणाऱ्या आर्थिक मदतीची रक्कम दुप्पट करण्याच्या निर्णयाला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी मंजुरी दिली आहे. निवृत्तीवेतन न मिळणाऱ्या वयोवृद्ध माजी सैनिकांना किंवा त्यांच्या विनाउत्पन्न विधवांना माजी सैनिक कल्याण विभागातर्फे देण्यात येणारे दरमहा ४ हजार रुपयांचे अनुदान वाढवून आता आठ हजार करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मुलांच्या शिक्षण आणि लग्नासाठी देण्यात येणारे अनुदानही दुप्पट झाले आहे.

----------------------------------------

**चंद्रशेखर आझाद**

महाराष्ट्र ही क्रांतीची भूमी आहे, त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक घरातून संघर्षाची मशाल पेटणे आवश्यक आहे. आपली राजकीय शक्ती दाखवून महाराष्ट्रात सत्ता निर्माण केल्याशिवाय स्वस्थ बसू नका, असे आवाहन खासदार आणि आझाद समाज पक्षाचे प्रमुख चंद्रशेखर आझाद यांनी केले. आझाद समाज पक्षाच्या वतीने नागपूरच्या सुरेश भट सभागृहात 'प्रबुद्ध जन' संमेलनाचे आयोजन काल करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

----------------------------------------

**कर्करोग जनजागृती**

नागपूर महानगरपालिका आणि रोटरी क्लब ऑफ नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आज पासून १७ ऑक्टोबर पर्यंत शहरात स्तनाच्या कर्करोग जनजागृतीसाठी अभियान राबविण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत मनपा मुख्यालय, सीताबर्डी, व्हेरायटी चौक, सदर उड्डाणपूल, शंकर नगर उद्यान, अजनी आणि एअरपोर्ट मेट्रो स्टेशन, तसेच अन्य प्रमुख ठिकाणांवर गुलाबी रोषणाई केली जाईल. मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार, महिलांमध्ये वाढत्या स्तनाच्या कर्करोगाविषयी जनजागृती करण्यावर भर देण्यात आला आहे. नागरिकांनी १६ ऑक्टोबर रोजी गुलाबी कपडे परिधान करून आणि आपली घरे आणि कार्यस्थळे गुलाबी रंगात उजळवून संदेश प्रसारित करावा, असे आवाहन मनपा आणि रोटरी क्लब कडून करण्यात आले आहे. या मोहिमेत माहितीपर संदेशांच्या माध्यमातून लोकांमध्ये स्तन कर्करोगाविषयी जागृती केली जाणार आहे.

-----------------------------------------

**'स्मरण पुरुषोत्तमाचे'**

जिल्हाधिकारी कार्यालय, भाषा संचालनालय आणि विदर्भ साहित्य संघ ग्रंथ सहवास यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन प्रेरणा दिनाचं औचित्य साधून 'स्मरण पुरुषोत्तमाचे' हा कार्यक्रम आज सायंकाळी नागपुरातील विदर्भ साहित्य संघाच्या अमेय दालनात आयोजित करण्यात आला आहे. ज्येष्ठ दिग्दर्शक आणि नाट्यलेखक पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्तानं त्यांच्या 'चंद्र नभीचा ढळला, कट्यार काळजात घुसली, वऱ्हाडी माणसं' या तीन प्रसिद्ध नाटकातील निवडक प्रवेशाचे अभिवाचन यावेळी करण्यात येणार आहेत.

-----------------------------------------

**हवामान**

येत्या काही तासात गडचिरोली, अमरावती आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता प्रादेशिक हवामान विभागान वर्तवली आहे.

-----------------------------------------